# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ : सीसीओ/373

दिनांक : 14/03/2016

मा. प्राचार्य/मा. संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक.

विषय : निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या अनुभवाच्या प्रमाणपत्रांबाबत....

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिनियम क्र. ४११ (२) अन्वये संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यामधील शिक्षक नियुक्तीचे अधिकार हे संबंधित महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थाचालकांना आहेत.

एखाद्या पदाच्या निवडीसाठी उमेदवारास अनुभवाची आवश्यकता असल्यास अशा उमेदवारांची नियुक्तीची शिफारस निवड समितीमार्फत झाल्यानंतर त्यांचे प्रस्ताव शिक्षक मान्यतेसाठी या विभागात सादर करताना त्या उमेदवाराकडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता असलेल्या शिक्षकी पदाच्या अनुभवाव्यतिरिक्त राज्यातील, परराज्यातील अथवा परदेशातील खाजगी संस्थेत अथवा औद्योगिक क्षेत्रात नोकरी केल्याचा अनुभव असेल तर त्यांच्या कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या नियोक्त्याकडून (Employer) पडताळणी करून खालीलप्रमाणे कागदपत्रे या विभागात सादर करावीत.

१) नियुक्ती आदेश (संस्थेचा पत्ता, मोबाईल व दूरध्वनी क्र. इ-मेल, या बाबींचा समावेश असावा)
२) अनुभवाचे प्रमाणपत्र (स्पष्ट नाव व कालावधीसह)
३) कार्यमुक्तीचे पत्र.
४) ज्या खाजगी संस्थेत/औद्योगिक क्षेत्रात नोकरी करीत असेल त्या संस्थेची त्या कालावधीतील आर्थिक उलाढाल रू.१५ कोटीपेक्षा जास्त असल्याचे संवैधानिक लेखापाल यांनी प्रमाणित केलेले पत्र.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे या विभागात सादर न झाल्यास सदर प्रस्तावावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

१४/३/१६

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)